## कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

ला. प्र. वि.

टोल फ्री क्रमांक - 1064

कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

**: प्रेस नोट :** दिनांक :- 27.02.2020.

**पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद शहर येथील पोलीस कर्मचारी श्री. रमेशलाल रामलाल जैस्वाल वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी पोहेकॉ/393 नेमणुक पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद शहर रा. प्लॉट नं 36 सईदा कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद यांना 15,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक **1) श्री. रमेशलाल रामलाल जैस्वाल वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी पोहेकॉ/393 नेमणुक पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद, प्लॉट नं 36 सईदा कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद**<br>2) गोपाल सोनवणे पोहेकॉ/**2035** पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद शहर |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक **26.02.2020** रोजी पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद शहर येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | **15,000/-** रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 26.02.2020 रोजी तक्रार दिली की, त्यांचे आईचे विरुध्द दाखल असलेल्या कलम 420 चे गुन्हयात जामीन करुन देण्यासाठी व त्यांना महाराष्ट्रातील इतर गुन्हयांमध्ये आरोपी न करणेसाठी पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद शहर जि औरंगाबाद येथील पोहेकॉ/393 रमेशलाल रामलाल जैस्वाल व पोहेकॉ/2035 गोपाल सोनवणे यांनी 15,000/- रूपयांची लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 26.02.2020 रोजी सापळा लावला असता लोकसेवक श्री. रमेशलाल रामलाल जैस्वाल वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी पोहेकॉ/393 नेमणुक पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद, औरंगाबाद शहर प्लॉट नं 36 सईदा कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद यांनी स्वत: पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथील पथकाने मंठा गाव ते पंचायत समिती मंठा रोडवर रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक 1) **श्री. रमेशलाल रामलाल जैस्वाल वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी पोहेकॉ/393 नेमणुक पोलीस ठाणे क्रांती चौक औरंगाबाद, औरंगाबाद शहर प्लॉट नं 36 सईदा कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद 2) गोपाल सोनवणे पोहेकॉ/2035 नेमणुक पो ठाणे क्रांती चौक औरंगाबाद शहर** यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.